पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# -: वार्तापत्र :-

दिनांक २१.०८.२०२०

## जिल्हा परिषद गडचिरोली प्रकरणात नविन आरोपीतास अटक करुन महत्वाचे दस्तऐवज तसेच इतर पुरावे स्थानिक गुन्हे शाखेने केले जप्त.

जिल्हा परिषद गडचिरोली चे नावाने युनियन बँक शाखा, गडचिरोली येथे असलेल्या बचत खात्यावरील रकमांचा अपहार करण्याकरीता संबधीत प्राधिकृत अधिका-यांच्या बनावट सहया व कार्यालयीन शिक्के मारुन बनावट चेक तयार करुन आर.टि.जी.एस.( R.T.G.S.) चे माध्यमातुन शासनाचे खात्यामधील 2,86,13,851/- रुपये बनावट बॅक खात्यावर वळती करुन अज्ञात आरोपीतांनी शासकिय रकमेचा अपहार केला अशा मजकुराचे फिर्यादिचे फिर्याद वरुन दिनांक १९.०९.२०१९ रोजी पोलीस स्टेशन गडचिरोली (महाराष्ट्र) येथे अप. क्र ४५८/२०१९ कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा,पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे तपासावर आहे.

आतापोवेतोचे तपासात एकुन ८ आरोपी १. स्नेहदिप श्रीराम सोनी वय 47 वर्षे रा. नंदनवन केडीके कॉलेज नागपुर 2) किशोरीलाल हिरालाल डहरवाल वय 51 वर्षे,रा. रेडडी ता.कुरई जि.शिवनी (म.प्र.) 3) सुदीप श्रीराम सोनी वय 51 वर्षे रा. नाईक रोड, महाल नागपुर, 4) अमित मनोहर अग्नीहोत्री वय 35 वर्षे, रा. धनगवळी नगर हुडकेश्वर नागपुर 5) अतुल देवीदास डुकरे वय 42 वर्षे, रा.प्लाट क्रमांक 66 आशिर्वादनगर नागपुर 6) विनोद मंगलसिंग प्रधान, वय 47 वर्षे रा. करडी ता.मोहाडी जि. भंडारा७) सुबोध गोपीचंद कांबळे वय 38 वर्षे रा. रामकृष्णनगर दिघोरी नागपुर ८) संजय ज्ञानेश्वर दळवी वय 48 वर्षे, रा. जलालपुरा शारदा चौक गांधी बाग नागपुर यांना यापुर्वी अटक करुन मोठया प्रमाणात मालमत्ता खरेदीचे कागदपत्रे तसेच आरोपी स्नेहदिप सोनी याचेकडुन मोठया प्रमाणात सोन्याची जप्तीकरण्यात आली आहे परंतु फसवणुकिच्या गुन्हयाचे तपासात अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे दस्तऐवजी पुरावे हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अहोरात्र परिश्रम करुन दिनांक २१.०८.२०२० रोजी गुन्हयातील मुख्य आरोपी स्नेहदिप श्रीराम सोनी रा. नंदनवन नागपुर याचा घनीष्ठ मित्र विवेक हुड रा. मनीष नगर नागपुर याचा शोध घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे संबधात कसुन तपास केला असता त्याने सांगीतले की गुन्हयातील मुख्य आरोपी स्नेहदिप सोनी याचे अटके नंतर त्याची पत्नी सौ अनीता सोनी हिच्या मदतीने खोटे कारण सांगुन नंदनवन झोपडपट्टि परीसरात भाडयाने रुम घेवुन तेथे बनावटीकरणाकरीता आरोपीने वापरलेली साहित्य लपवुन ठेवली आहेत. त्यावरुन पोलीसांनी तात्काळ विवेक हुड यास अटक करुन त्याचे सांगणे प्रमाणे नियोजन बध्द योजना आखुन मध्यरात्री दरम्यान नंदनवन झोपडपट्टि परीसरात संबंधीत घरी छापा टाकला असता, तेथील बनावटीकरणाचे साहित्य बघुन पोलीस देखील अवाक झाले. त्या साहित्यांमध्ये लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर, बनावट रबरी स्टॅम्पकरीता वापरण्यात येणारे विविध प्रकारचे शिक्के, बनावट धनादेश तयार करण्याकरीता वापरण्यात येत असलेले ट्रेस पेपर्स, मशीन, वेगवेगळया प्रकारच्या इंक व बार कोडींग करीता वापरण्यात येत असलेली साहित्य, मोबाईल फोन या सारखे इतर बनावटीकरणाकरीता वापरण्यात येणारे मोठया प्रमाणातील साहित्य जप्त करण्यात पोलीसांना यश मिळाले. सदर साहित्यात महाराष्ट्र व मध्यप्रदेश येथील अनेक शासकिय कार्यालयाचे बनावट शिक्के,

बनावट लोकांचे खाते, बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणुक कार्ड, वाहन चालक परवाने मिळुन आल्याने त्या दिशेने स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली चा तपास सुरु आहे. एकंदरीत आरोपीचे कार्यक्षेत्र व नियोजन लक्षात घेता भविष्यात अशा प्रकारचा अपहार करण्याचे बेतात असलेल्या आरोपीतांना अटक करुन पोलीसांनी त्यांचे मनसुबे उधळुन लावले आहे. तसेच मुख्य आरोपी याने अपहार केलेल्या रक्कमेतून आपल्या व पत्नीच्या नावे २८ लाखाचे केलेले एफ.डी. बॉण्ड बँकेतून जप्तकरण्यात गडचिरोली पोलीसांना यश प्राप्त झाले.

मुख्य आरोपी सोबत सक्रिय राहुन काम करणारा आरोपी विवेक शेषराव हुड वय ४७ वर्षे रा. मनीषनगर नागपुर याचा मा. न्यायालयाने दिनांक २७.०८.२०२० पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे. नमुद गुन्हयात सक्रिय असलेल्या इतर आरोपीतांची नावे निष्पन्न करुन त्यांची भुमीका व सहभाग स्पष्ट होताच त्यांना अटक करण्याची तजवीज ठेवली आहे.

सदर गुन्हयाची तपास प्रक्रिया श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक, श्री मोहीतकुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली यांचे नेतृत्तवात गुन्हयाचे तपासी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी, यांचेसह सहा. पोलीस निरीक्षक विक्रांत सगणे, पोलीस उप निरीक्षक भागवत कदम, तसेच तपास पथकातील सक्रिय अंमलदारानी विशेष परिश्रम घेतले आहे.